# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/२०२५ दि. २४ फेब्रुवारी, २०२५

जळगाव दि.२४ ( प्रतिनिधी) :- गोंडवाना विद्यापीठाच्या वतीने चंद्रपुर येथे झालेल्या आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सव स्पर्धेत कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाला ३ सुवर्ण आणि एक कास्य पदक प्राप्त झाले.

दि. १७ ते २२ फेब्रुवारी या कालावधीत हा महोत्सव झाला. या महोत्सवात विद्यापीठाला ३ सुवर्ण पदक प्राप्त झाले. त्यामध्ये ५ हजार मीटर धावण्याच्या मैदानी स्पर्धेत रिंकी पावरा (जीटीपी महाविद्यालय, नंदुरबार), ८०० मीटर धावण्याच्या मुलींच्या स्पर्धेत शेवंता पावरा (एच.आर.पटेल महाविद्यालय, शिरपुर) आणि ८०० मीटर धावण्याच्या मुलांच्या स्पर्धेत तुषार नाईक (व्ही.एस.महाविद्यालय, रावेर) या तीन जणांनी सुवर्णपदक प्राप्त केले. तसेच ४ x ४०० मीटर रिले प्रकारात कास्य पदक प्राप्त झाले. या रिलेमध्ये प्रशांत पाटील (विद्याधन महाविद्यालय,धुळे), शैलेश पावरा (विद्यावर्धीनी महाविद्यालय,धुळे), आकाश पावरा (एस.पी.डी.एम.महाविद्यालय, शिरपुर), तुषार सुर्यवंशी (व्ही.एस.नाईक महाविद्यालय,रावेर) व विशाल बोदडे (डी.एन.महाविद्यालय,फैजपूर) या खेळाडूंचा समावेश होता. संघासोबत प्रशिक्षक म्हणून डॉ.शैलेश पाटील व डॉ. व्ही.के.पाटील गेले होते. विजेत्या विद्यार्थ्यांचा कुलगुरू प्रा.व्ही.एल.माहेश्वरी यांनी सोमवारी कुलगुरु दालनात सत्कार केला. प्रा.माहेश्वरी यांनी खेळाडूंना अधिक सुविधा द्याव्यात व विशेष सराव शिबीराचे आयोजन केले जावे अश्या सुचना दिल्या. यावेळी कुलसचिव डॉ. विनोद पाटील, क्रीडा संचालक डॉ.दिनेश पाटील, प्रशिक्षक डॉ.शैलेश पाटील व डॉ.व्ही.के.पाटील उपस्थित होते.

बातमी क्र. २

जळगाव दि.२४ ( प्रतिनिधी) :- पुणे येथील आयआयसीएमआर संस्थेच्या वतीने झालेल्या “उडान 2K25” या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या व्यवस्थापनशास्त्र प्रशाळेच्या विद्यार्थ्यांनी विविध श्रेणीत २ विजेतेपद आणि २ उपविजेतेपद प्राप्त केले.

गेल्या आठवड्यात ही स्पर्धा पार पडली. “शरलॉक होम्स फाइंड्स द केस” या श्रेणीत अलोक माळी, मेघना वार्डे यांनी विजेतेपद आणि मनिषा जोधा, सुमेध शिरतुरे यांनी उपविजेते पद प्राप्त केले. तर ‘आयडीएशन बीझस्पार्क’ गटात नयन पाटील, मेघना भोळे, अंजली सोनार व भावना कुमावत

यांना उपविजेते पद आणि ‘कार्पोरेट चाणक्य’ श्रेणीत प्रथम धम्मरत्न, भाग्यश्री पाठक, भक्ती सपकाळे, व शितल पाटील यांच्या संघाने विजेते पद प्राप्त केले. या स्पर्धेतील दामिनी पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे समन्वयक व मार्गदर्शक डॉ.आर.आर.चव्हाण यांनी स्पर्धेतील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. यावेळी प्रशाळेच्या संचालक प्रा.मधुलिका सोनवणे, प्रा.रमेश सरदार, डॉ. आर.आर.चव्हाण उपस्थित होते.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनंसपर्क अधिकारी